सौ.जरीना शेख व.१ वि.
श्री.संदीपकुमार हंचलीकर व.१

## फौजदारी किरकोळ अर्ज.क्र.२९६/२०२१ मधील निशाणी क्र.६ खालील आदेश

( दि.२८/०३/२०२२ रोजी पारित केला )

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार हिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ प्रमाणे कलम २० खाली आर्थिक सहाय्य व कलम १९ प्रमाणे अंतरिम आदेश मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

०२. अर्जदार असे कथन करते की, तिचा व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दि.१४/०३/२०१९ रोजी मुस्लिम धर्मपद्धतीने झालेला आहे. अर्जदार ही मुस्लीम धर्मीय असून सामनेवाला क्र.१ हा हिंदू धर्मीय आहे. अर्जदार व सामानेवाला क्र.१ यांचे लग्नाच्या दोन वर्ष अगोदरपासून प्रेमसंबंध होते व नंतर सामनेवाला क्र.१ याने स्वतःचे धर्मांतर करुन, मुस्लीम धर्माच्या रितीरिवाजानुसार लग्न केले.

०३. अर्जदारचे पुढे असे कथन आहे की, विवाहानंतर अर्जदार व सामनेवाला क्र.१ हे ठाणे, राबोळी येथे राहण्यासाठी गेले. सुरुवातीला काही दिवस सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला व्यवस्थित नांदवले. त्यानंतर, अर्जदारला असे समजले की, सामनेवाला क्र.१ याच्यावर भा.द.वि.सं.कलम ३७६ अन्वये खोपोली येथे गुन्हा दाखल आहे. तसेच, त्याचे प्रियंका नावाच्या मुलीसोबत साखरपुडा झालेला अशी माहिती तिला प्रियंका हिच्या घरच्यांकडून समजली. त्यानंतर, दि.१७/०४/२०२० रोजी अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांना विवाहसंबंधातुन मुलगा हारीस याचा जन्म झाला.

०४. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, त्यानंतर सामनेवाला क्र.१ हा अर्जदार हिला ठाणे येथेच सोडून खोपोली येथे त्याच्या आई-वडिलांकडे निघून आला. अर्जदार ही लहान मुलाला घेऊन काही दिवस तेथे एकटीच राहिली. त्यानंतर ती

सामनेवाला क्र.१ याला ठाणे येथे परत कधी येणार म्हणून विचारणा करीत असत, त्यावेळी सामनेवाला क्र.१ हा उडवाउडवीची उत्तरे देत असत. पुढे सामनेवाला क्र. १ याने अर्जदार हिला मुलासह खोपोली येथील घरी आणले.

०५. अर्जदार ही सामनेवाला क्र.१ सोबत खोपोली, क्रांतीनगर येथे राहण्यासाठी गेल्यानंतर, सामनेवाला क्र.१ व २ हे अर्जदार हिला मानसिक व शारिरीक त्रास देत असत. तसेच, सामनेवाला क्र.२ हि अर्जदार हिच्या मुलाला नेहमी मारझोड करणे, तिरस्कार करणे अशा प्रकारचा छळ करीत असत. त्याचप्रमाणे, सामनेवाले हे अर्जदार हिस आर्वाच्च्य भाषेत शिविगाळ करीत असत तसेच ती काम करीत नाही, आळशी आहे, कामचोर आहे अशा प्रकारचा मानसिक व शारिरीक छळ करीत होते.

०६. अर्जदार हीचे पुढे असे कथन आहे की, तिचे कोणतेही उत्पन्नाचे साधन नसून तिला तिच्या उदरनिर्वाहासाठी दरमहा रक्कम रु.२५,०००/- निर्वाह खर्चाची आवश्यकता आहे. तसेच, तिला स्वतंत्र भाडयाच्या घरामध्ये राहण्यासाठी दरमहा रक्कमेची घरभाडयासाठी आवश्यकता आहे. सबब, तिने प्रस्तुतचा मुळ अर्ज सदर कायद्याचे कलम १२ प्रमाणे दाखल केलेला आहे. तिने प्रस्तुतचा अर्ज महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३ प्रमाणे कलम २० खाली आर्थिक सहाय्य व कलम १९ खाली घरभाडयापोटी रक्कम मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०७. सामनेवाले हे हजर झाले, परंतु त्यांना पुरेशी संधी देऊन देखील त्यांनी म्हणणे सादर केले नाही. त्यामुळे, अर्ज त्यांच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आला.

०८. अर्जातील कथने लक्षात घेता खालीलप्रमाणे मुद्दे निश्चितीकरणासाठी उपस्थीत होत आहेत. त्यावरील निष्कर्ष मी अनुमान काढून कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | सामनेवाला यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे प्रथम दर्शनी दिसते काय ? | **होकारार्थी.** |
| ०२. | सामनेवाला यांच्याकडून अंतरिम पोटगीची रक्कम मिळणेस अर्जदार पात्र आहे काय ? असल्यास किती? | **अंशतः होकारार्थी. सामनेवाला क्र.१ याच्याकडून अर्जदार दरमहा रक्कम रु. २,०००/- मिळण्यास पात्र आहे.** |
| ०३. | अर्जदार हिने मागणी केलेप्रमाणे ती निवासाचे अंतरिम आदेश अथवा घरभाडयापोटी रक्कम मिळण्यास पात्र आहे का ? | **अंशतः होकारार्थी.** |
| ०४. | अर्जदारने मागणी केलेल्या इतर अंतरिम मागण्या ती मिळण्यास पात्र आहे का ? | **नकारार्थी.** |
| ०५. | काय आदेश ? | **अर्ज अंशतः मंजुर करणेत येत आहे.** |

## कारणमिमांसा

०९. अर्जदारतर्फे विधीज्ञांनी केलेला युक्तीवाद ऐकला. अर्जदारने तिच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ बरीचशी कागदपत्रे दाखल केलेली आहेत. आवश्यक त्या कागदपत्रांचा उल्लेख मी माझ्या कारणमीमांसेमध्ये करीत आहे.

**मुद्दे क्र.१ व २ करीताः-**

१०. अर्जदार व सामनेवाला क्र.१ यांचा विवाह दि.१४/०३/२०१९ रोजी झालेला असल्याचे विवाह प्रमाणपत्रावरुन दिसत आहे. तसेच, सामनेवाला क्र. २ ही सामनेवाला क्र.१ याची आई असल्याची बाब देखील वादांकित नाही. त्यामुळे, अर्जदार व सामनेवाला यांच्यामध्ये कौटुंबिक नातेसंबंध (Domestic Relation) असल्याचे प्रथमदर्शनी दिसत आहे.

११. प्रस्तुत प्रकरणात प्रथमदर्शनी अर्जदार हिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाला

आहे अथवा नाही हे पाहण्यासाठी अर्जातील कथने अभिलेखावर आहेत. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायद्याच्या मुळ हेतूचा विचार करावयाचा झाल्यास तो हेतु सामनेवाला यांच्या कथनांपेक्षा अधिक महत्वाचा आहे असे मला वाटते. अर्जदार हिने अर्जातील कथनांच्या पुष्ट्यर्थ प्रतिज्ञापत्र देऊन शपथेवर तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे सांगितलेले आहे. त्यामध्ये तिने सामनेवाला यांनी तिचा मानसिक, आर्थिक व शारिरिक छळ केल्याचे कथन केलेले आहे. एखादी स्त्री विनाकारण तिच्या पती व त्याच्या नातेवाईंकाविरुध्द हिंसाचार झाल्याबाबतची खोटी कथने करेल असे प्रथमदर्शनी मला वाटत नाही. त्यामुळे, प्रथमदर्शनी तरी अर्जातील कथने ही सत्य आहेत असे दिसते. अर्जातील नमुद कृत्ये ही कौटुंबिक हिंसाचाराच्या संज्ञेत मोडत आहेत, त्यामुळे प्रथमदर्शनी सामनेवाला यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे दिसत आहे.

१२. अर्जदारने सदर कायद्याचे कलम २३ अंतर्गत आर्थिक साहाय्य व निवासी आदेश मिळण्याची विनंती केलेली आहे. सदर कलमाखाली एखाद्या अर्जावरुन असे उघड होत असेल की, उत्तरवादी कौटुंबिक हिंसाचाराची कृती करीत आहे किंवा त्याने तशी कृती केली आहे किंवा उत्तरवादी कौटुंबिक हिंसाचाराची कृती करील अशी शक्यता आहे याबाबत दंडाधिका-याचे समाधान झाले असेल तर, त्याला बाधित व्यक्तिच्या शपथपत्राच्या आधारावर, उत्तरवादीविरुध्द सदर कायद्याचे कलम १८ ते २२ अन्वये अंतरिम आदेश देण्याचे अधिकार आहेत. यापुर्वीच्या परिच्छेदामध्ये प्रथमदर्शनी अर्जदारने प्रतिज्ञापत्राव्दारे सामनेवालांची कृती कौटुंबिक हिंसाचार असल्याचे सिध्द केलेले आहे. त्यामुळे, आता ही बाब पाहणे गरजेचे आहे की, अर्जदार कलम २३ अंतर्गत अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे का ?

१३. अर्जदारचे असे कथन आहे की, तिचे कोणतेही उदरनिर्वाहाचे साधन नाही. तसेच, तिची राहण्याची देखील कोणतीही व्यवस्था नाही. त्याऊलट, सामनेवाला क्र.१ हा क्रेन ऑपरेटर असून त्याला दरमहा रक्कम रुपये वीस ते पंचवीस हजार पगार आहे. तो तिचा उदरनिर्वाह करण्यास समर्थ आहे. सामनेवाला याने सदरची बाब म्हणणे देऊन नाकारलेली नाही. त्यामुळे, ही बाब स्पष्ट होते की, अर्जदार हीच्याकडे स्वतःचा उदरनिर्वाह करण्यास कोणतेही साधन नाही. सामनेवाला क्र. १ हा अर्जदारचा पती

असल्यामुळे, तिच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था करण्याची त्याची नैतिक जबाबदारी आहे. ती जबाबदारी सामनेवाला क्र.१ नाकारु शकत नाही. तसेच, सामनेवाला क्र.१ नोकरी करीत असल्याची व त्यातुन त्याला मासिक पगार मिळत असल्याची बाब विना आव्हानित आहे. त्यामुळे, अर्जदार, सामनेवाला क्र.१ याच्याकडून मासिक निर्वाह भत्त्याची रक्कम अंतरिम स्वरुपात मिळण्यास पात्र आहे.

१४. अर्जदार हिने दरमहा रक्कम रु.२५,०००/- अंतरिम पोटगीची मागणी केली आहे. सदर कायद्याचे कलम २० मध्ये नमुद केल्याप्रमाणे आर्थिक मदत ही पुरेशी, न्याय्य, योग्य व पिडीत व्यक्तीचे राहणीमानाशी सुसंगत असणे बंधनकारक आहे. अर्जदार हीला स्वतःच्या किमान दैनंदिन गरजा, दररोज वाढत जाणारी महागाई इ. बाबींचा विचार करता दरमहा रक्कम रु. २,०००/- (अक्षरी रुपये तीन हजार मात्र) अशी पोटगी पुरेशी ठरेल असे मला वाटते. सामनेवाला क्र.१ याच्या मासिक उत्पन्नाबाबत विश्वासार्ह पुरावा अभिलेखावर नसला तरीदेखील त्याला त्याची नैतिक जबाबदारी नाकारता येणार नाही. त्यामुळे, अर्जदार, सामनेवाला क्र.१ याच्याकडून दरमहा रक्कम रु.२,०००/- आर्थीक साहाय्य मिळण्यास पात्र आहे. सदरची रक्कम अर्ज दाखल तारखेपासून देय राहील. वरील कारणांमुळे मी मुद्दे क्र.१ व २ चे निष्कर्ष त्याअनुषंगाने नोंदवित आहे.

**मुद्दे क्र.३ व ४ करीताः-**

१५. तसेच अर्जदारने निवासाचे आदेश अथवा घरभाडयापोटी अंतरिम स्वरुपात दरमहा रक्कम रुपये ९,०००/- ची मागणी केलेली आहे. सदर कायदयाचे कलम १९ प्रमाणे निवासाचे अंतरिम आदेश देण्याची तरतुद आहे. परंतु, अर्जदारने विभागून राहत असलेल्या घराचा तपशिल दिलेला नाही अथवा त्याबाबत प्रथमदर्शनी पुरावा देखील अभिलेखावर आणलेला नाही. त्यामुळे, त्याबाबत आदेश करणे उचित होणार नाही. परंतु, त्याऊलट, तिने घरभाडयापोटी रक्कमेची मागणी केलेली आहे. तिच्या निवासाची कोणतीही व्यवस्था नसल्याचे अभिलेखावरुन दिसते. तिने विभागुन राहत असलेल्या घराबाबत प्रथमदर्शनी पुरावा दिलेला नसल्यामुळे तिला घरभाडयापोटी रक्कम देण्याची आवश्यकता आहे असे दिसते. सबब, ती घरभाडयापोटी रक्कम रु. १,०००/- मिळण्यास

पात्र राहत आहे.

१६. त्यापुढे तिने इतर अंतरिम मागण्यांची विनंती केलेली आहे. परंतु, त्या मागण्या सविस्तर पुराव्याशिवाय अंतरिम स्वरुपात देता येणार नाही असे माझे मत झाले आहे. सबब, मी मुद्दा क्र.३ चा निष्कर्ष अंशतः होकारार्थी व मुद्दा क्र.४ चा निष्कर्ष "नकारार्थी" नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ करीताः–**

१७. मुद्दे क्र.१ ते ४ मध्ये केलेल्या सविस्तर कारणमीमांसेच्या अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे:-

**:-आदेश-:**

| | |
|---|---|
| **०१.** | अर्ज (निशाणी क्र.६) अंशतः मंजुर करणेत येत आहे. |
| **०२.** | अर्ज दाखल तारखेपासून अंतीम आदेशापावेतो पोटगीची रक्कम म्हणून सामनेवाला क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रक्कम रु. २,०००/- (अक्षरी रुपये दोन हजार मात्र) द्यावेत. |
| **०३.** | तसेच, अर्ज दाखल तारखेपासून सामनेवाला क्र.१ याने अर्जदारला घरभाडयापोटी अंतरिम दरमहा रक्कम रु.१,०००/- (अक्षरी रुपये एक हजार मात्र) द्यावेत. |
| **०४.** | सदर आदेशाची प्रत विनामुल्य उभय पक्षकारांना देण्यात यावी. |
| **०५.** | खर्चाबाबतचे आदेश मुळ अर्जातील अंतिम आदेशाप्रमाणे. |

(आदेश खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PRADIP MADAN MANE
Date: 2022.03.28 19:30:26 +0530

दिनांकः २८/०३/२०२२.
खालापूर.

**(पी.एम.माने)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, खालापूर.